Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाउंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 2 रे • अंक : 4 था
जुलै – सप्टेंबर 2023
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

## संपादकीय ...

म्हातारपण हे देवाने माणसाला बहाल केलेले दुसरे बालपण होय. मनुष्याचा वृद्धापकाळ हा नेहमी समाधानी आणि आनंदपूर्ण असायला हवा ,त्यासाठी सामाजिक आणि कौटुंबिक सहाय्य त्यांना लाभले पाहिजे, जेणेकरून शेवटची काही वर्षे त्यांना सुखाने आयुष्य जगता येईल . असा उदात्त हेतू लक्षात घेऊन तरुणपिढीने त्यांना सन्मानयुक्त जगवणे गरजेचे आहे.आर्थिक सुबत्ता, वैज्ञानिक संशोधन, आधुनिक उपचार पद्धती, यामुळे वयोमर्यादा वाढली आहे. त्यामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्या देखील वाढली आहे. साधारणतः ज्येष्ठांचे तीन प्रकार असतात. 58 ते 65 वयोगट, 65 ते 75 वयोगट, आणि 75 आणि त्यापुढील वयोगट, अशा तीन प्रकारात ज्येष्ठांची विभागणी होते.प्रत्येकाने आपल्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींचा सांभाळ करणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. वार्धक्यामुळे शरीर जीर्ण झालेले असते, मग शारीरिक आणि मानसिक व्याधी मागे लागतात. शारीरिक व्याधींसाठी वैद्यकीय उपचारांची गरज असते.

आमची संस्था 10 ऑक्टोबर 2009 रोजी स्थापन झाली आणि लवकरच संस्थेला 14 वर्षे पूर्ण होतील. आत्तापर्यंत एकट्या दुकट्या राहणाऱ्या तसेच अपंग, आजारी असणाऱ्या जेष्ठ नागरिकांना त्यांचे घरी जाऊन आम्ही मदत करीत असतो आणि आजपर्यंत वीस हजार पेक्षा जास्त वेळा जेष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांची सेवा केलेली आहे . या सेवेत त्यांची बँकिंगची कामे किंवा घरात सामान आणून देणे, फिरायला घेऊन जाणे या कामांचा समावेश होता, परंतु आरोग्यासाठीची मदत फार कमी प्रमाणात होती. म्हणून 2 मे 2023 पासून आम्ही एक अभिनव सेवा देण्यास सुरुवात केली आहे दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल हे पुण्यातील खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठे हॉस्पिटल आहे. तेथील रुग्णांना मदत करण्यासाठी मे आय हेल्प यू (May I help you ) हा काउंटर आम्ही हॉस्पिटल ट्रस्टच्या मदतीने सुरु केला आहे. या प्रकल्पाचा उदघाटन समारंभ हॉस्पिटलचे प्रमुख आणि ट्रस्टी डॉ. धनंजय केळकर सर यांच्या हस्ते 2 मे 2023 रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाला हॉस्पिटलचे – A.O.श्री. व्यवहारे सर , तसेच मायाकेअरचे डायरेक्टर डॉक्टर सुरेश गोखले सर उपस्थित होते. मायाकेअर फौंडेशन चे संस्थापक मॅडम मंजिरी गोखले–जोशी व अभय जोशी सर सध्या इंग्लंड मध्ये असल्याने प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत तथापि त्यांनी इंटरनेटच्या साहाय्याने या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला मायाकेयरचे पुणे शहरातील स्वयंसेवक उपस्थित होते .

हॉस्पिटल मध्ये आलेल्या रुग्णांना कुठे जावे, कोणाला भेटावे याचे नेमके मार्गदर्शन करणे , त्यांचे केसपेपर तयार करणेसाठी जो अर्ज रुग्णांना किंवा त्यांच्या नातलगांना भरून देणे आवश्यक असते तो भरणेबाबत मार्गदर्शन करणे , रुग्णाने आरोग्य विमा काढला असेल तर त्याचा फॉर्म भरणेबाबत मदत करणे तसेच रुग्णाच्या तपासणीबाबतचे रिपोर्ट देणेबाबत मदत करणे , रुग्णांना आवश्यक असेल तर औषधे आणून देणे ,रुग्ण जर हॉस्पिटल मध्ये दाखल झाला असेल तर त्याच्या सोबतच्या नातेवाईकाला एक दोन तासांसाठी बाहेर जायचे असेल तर रुग्णाला सोबत करणे रुग्ण आय सी यु मध्ये असेल तर आय सी यु च्या बाहेर थांबणे, हॉस्पिटलचे बिल भरणेसाठी आर्थिक मदतीबाबत ज्या शासकीय/ निमशासकीय योजना आहेत तसेच जे खाजगी ट्रस्ट अशी मदत करतात त्यांची माहिती रुग्णांच्या नातेवाईकांना देणे, रुग्ण हॉस्पिटल मधून घरी जाताना त्याला रिक्षा टॅक्सी मिळवून देणे, तो घरी गेल्यावर जर तो जेष्ठ नागरिक असेल तर त्याच्या घरी जाऊन त्याला आवश्यक ती मदत करणे इत्यादी मदत करण्यास आम्ही सुरुवात केली आहे.अर्थातच या सेवा पूर्णपणे मोफत आहेत. इतके दिवस आम्ही फक्त जेष्ठ नागरिकांना सेवा देत होतो पण हॉस्पिटल मध्ये मात्र आम्ही सर्व आबालवृद्ध रुग्णांना सेवा देत असतो.

ही सेवा पुणे शहरातील एका हॉस्पिटल मध्ये सुरु झाली असली तरी पुण्यातील इतर हॉस्पिटल्स आणि काही इतर शहरात मोठ्या हॉस्पिटल्समध्ये सुरु करण्याचा आमचा मानस आहे .

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

मला कळवताना आनंद वाटतो की,माझ्या मिसेसच्या कॅन्सरचे उपचारासाठी माया केअरचे सर्व स्वंयसेवकाची प्रचंड मदत झाली आहे . उदा.माझ्या घरी येऊन तिला मंगेशकर हॉस्पिटर मध्ये अत्यंत काळजीपूर्वक घेऊन जाणे व परत आणणे , प्रेमाने धीर देणे,उच्च दर्जाची नम्र वागणूक, संपूर्ण क्रिया निरपेक्ष बुद्धीने केली . मी माधुरी मॅडम यांना व माया केअर यांना मनापासून धन्यवाद देतो.

शशिकांत जोगळेकर , पुणे. मो.+91 92268 92294

***

आज दुपारी जवळ जवळ 2 वाजता माया केअर ची स्वयंसेवक अनुजा कदम हि आली होती मला भेटायला . ती शनिवारी येणार होती पण तिला येणं जमल नाही तर ती आज आली होती. बरं वाटलं मला. ती खूप उत्कृष्ट काम करते माया केअर चं खरंच मला कौतुक वाटतं कारण या जगात कोणी कोणाची अशी मदत करत नाही. खरंच विश्वास बसत नाही . माया केअर फाउंडेशन आमच्या सारख्या सिनिअर सिटीझन ची फ्री मदत करतात , खूप खूप धन्यवाद. माया केअर तुम्ही असेच काम करत राहावे खूप धन्यवाद.

सुमंगला अभ्यंकर, मो. 9987835514 टिटवाळा, पुणे

***

माया केअर फाउंडेशन याच्या कडून शारदा परमेकर हे स्वयंसेवक आले होते . त्यांनी माझ्या सोबत गप्पा मारल्या. माझ्या सोबत छान को ऑपेरेशन केले. मला सर्व गोष्टी सांगितल्या त्यांच्यासोबत बोलून माझ्या मन हलके झाले . मी त्यामध्ये समाधानी आहे. आणि मला त्यामुळे हा विश्र्वास आहे की मी फोन केल्यानंतर नक्कीच त्या माझ्या मदतीला येतील .माझी मुलगी मंतिमंद आहे. तिच्या सोबत राहण्या करीता मला त्यांच्या मदतीची गरज पडेल. त्या म्हणाल्या मी नक्कीच येणार, त्या माझ्या सोबत कुटुंबीयासारख्या वागल्या. खुपु धन्यवाद. मला खूप आनंद झाला.

लक्ष्मण शिंदे , मो. 9359724304, विरार, मुंबई

***

माया केअरच्या एक स्वयंसेविका शारदा परमेकर मला मदत करायला माझ्या समवेत नानावटी हॉस्पिटल आल्या होत्या . आणि त्या नंतर त्या माझ्या सोबत घरीहि पोहोचवायला आल्या. त्याची मला खूप मदत झाली आणि अशीच मला पुढे मदत भासली तर मी माया केअर ला फोन करेन . मला आज जी मदत केली माया केअर फॉउंडेशन तर्फे ती खूपच महत्वाची होती आणि माझ्यासाठी मोलाची होती. आणि असेच सहकार्य तुम्ही पुन्हा पुन्हा कराल अशी मला आशा वाटते धन्यवाद.

मिसेस शोभा कपिले, मो. 9967111446 गोरेगाव मुंबई

***

नमस्कार मी सतीश फिरके ,पुणे निवासी सामाजिक कार्यकर्ता वय 68 वर्ष , मला नेत्रविकारामुळे मुळे अंधत्व आले आहे. आणि घरातून एकटे बाहेर पडणे बंद झाले. घरात किती वेळ एकटे बसून राहणार ? त्या मुळे मोठ्या प्रमाणावर शारीरिक एवंम मानसिक समस्या निर्माण झाल्या . मला माया केअर फाउंडेशन बदल माहित पडले . त्याचे स्वयंसेवक श्री संतोष महाजन यांनी सुरुवातीला चांगला सपोर्ट केला. त्या मुळे मी या समस्येतून बाहेर पडू शकलो. त्या नंतर श्रीमती
वि नितानाई महाजन यांनी माझी श्री गजानन ढोरे साहेबांशी ओळख करून दिली. त्या नंतर आम्ही बाहेर फिरायला जायला लागलो. ते हॉस्पिटलला माझ्याबरोबर यायला लागले,न्यूज पेपर किंवा बुक्स वाचून देऊ लागले.आणि मला पुन्हा समाजामध्ये आल्याल्या सारखे वाटले. माझ्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्या .आपले हे कार्य सिनिअर सिटीझन करीता पुनर्जन्म आहे. या कामाला मोठ्या प्रमाणात यश लाभो अशी शुभेच्छा व्यक्त करतो .परमेश्वराचे चरणी प्रार्थना करतो की उत्तरोत्तर हे कार्य असेच वाढत जावो आणि मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिकांनी याचा लाभ मिळो. धन्यवाद .

श्री सतीश फिरके, मो. 9371092477, कोथरूड पुणे

***

# माया केअर तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा.

21 जून 2023 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून माया केअर तर्फे विविध वृद्धाश्रमात योग दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये स्वयंसेवकांनी योगाचे वेगवेगळे प्रात्यक्षिक करून दाखवले. वृद्धांच्या आयुष्य वाढीसाठी व वाढत्या वयासोबत योगा हा खूप फायदेशीर ठरतो या दृष्टिकोनातून ज्येष्ठांना महत्त्व समजावून सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील नागपूर ,चंद्रपूर ,अकोला ,सोलापूर ,परभणी ,अमरावती, सातारा ,मुंबई या शहरांमध्ये विविध ठिकाणी 15 वृद्धाश्रमांमध्ये व महाराष्ट्राबाहेरील 6 शहरांमध्ये 6 वृद्धाश्रमांमध्ये हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# माया केअर वृत्त

1. आपले लाभार्थी प्रा.सुधाकर कुलकर्णी यांच्या स्वर सुगंध संगीत मंचची संगीत संध्या माया केअर फाउंडेशन तर्फे दिनांक. 22 एप्रिल 2023 रोजी संध्याकाळी फेसबुक लाईव्ह माध्यमातून स्वयंसेवक विद्याधर जोशी यांचे घरी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात प्रा सुधाकर कुलकर्णी, राहुल समेळ, मयुरा काळे आणि रमा काजरेकर यांनी मराठी व हिंदी सुमधुर गीते सादर केली. निवेदन श्री. विद्याधर जोशी यांनी केले. सुमारे दीड तास चाललेल्या या कार्यक्रमाचा जगभरातील सुमारे 150 श्रोत्यांनी आस्वाद घेतला. सर्वांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद देऊन सर्व गायकांचे मनापासून कौतुक केले.

2. स्वयंसेवक श्री महेश कुलकर्णी यांनी दिनांक 25 एप्रिल 2023 रोजी रा.स्व. संघाच्या पुणे येथील शृंगेरी प्रभात शाखा डावी भुसारी कॉलनी कोथरूड आणि गणंजय सोसायटी शाखा येथे माया केअरच्या सेवांची माहिती दिली.

3. दिनांक 25 एप्रिल 2023 रोजी पोतनीस परिसर पुणे येथील के – 52 सोसायटी मध्ये श्री रमेश फडके आणि श्री जतिन पटेल यांनी बासरी वादनाचा उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम माया केअर तर्फे सादर झाला.

4. आई आधार केंद्र बावधन, पुणे येथे दिनांक 31 मे 2023 रोजी स्वयंसेविका सौ. अरुणा अवत्रमणी यांची कन्या कु. वेदा हिने आजी आजोबांच्या सेवेसाठी चित्रकला कार्यशाळा घेतली. सर्व आजी आजोबांना हा प्रकल्प खूप आवडला.यावेळी स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर उपस्थित होते.

5. स्वयंसेवक, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री महेश कुलकर्णी यांच्या माझा लेखन छंद आणि छंदावरील लेखन या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा वटपौर्णिमेच्या मुहूर्तावर दिनांक 3 जून 2023 रोजी माया केअर स्वयंसेवक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विनिता महाजन, विनोद दफ्तरदार आणि माया केअर संस्थापक सदस्य डॉ सुरेश गोखले यांच्या हस्ते कोथरूड येथे संपन्न झाला . संस्थेचे लाभार्थी प्रा. सुधाकर कुलकर्णी यांनी या सोहळ्याचे अध्यक्षपद भूषविले. महेश कुलकर्णी यांचे हे पुस्तक म्हणजे त्यांचे वृद्ध सेवेतील कार्य, काव्य परीक्षण, चित्रपट परीक्षण, पर्यटन , माहिती संकलन यावरील लेखांची माहिती आहे. हे पुस्तक सर्व वयोगटातील वाचकांना आणि मुख्यत्वे ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारे आहे. पुस्तकाच्या विक्रीतील काही भाग माया केअरला देणगी म्हणून दिला जाईल.

6. शनिवार दिनांक 10 जुन रोजी संध्याकाळी 5.30 ते 6.30 , संकल्प महिला मंडळातर्फे बेडेकर गणपती पौड रोड येथे आपल्या संस्थेचे संस्थापक डॉ सुरेश गोखले यांचे ''पन्नाशीनंतरचे स्त्रियांचे शारिरीक आणि मानसिक आरोग्य या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी प्रश्नोत्तराच्या रुपाने आपल्या स्वयंसेविका वीणा जोग यांनी त्यांची मुलाखत घेतली .सहज सुलभ व्यायाम, व्हिटॅमिन **D-3** आणि **B-12** याविषयी, तसेच पन्नाशीनंतर स्त्रियांमध्ये उद्भवणाऱ्या आरोग्य विषयक समस्या अशा विविध विषयांवर डॉ गोखले यांच्याशी मनमोकळ्या गप्पा झाल्या. सुमारे 50 ते 60 स्त्रियांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला

7. निवारा वृद्धाश्रम नवी पेठ येथे दिनांक 16 जून 2023 रोजी श्रावणरंग या संगीत समूहाने विविध गीते सादर करून आजी आजोबांना आनंद दिला. संस्थेचे प्रमुख श्री मुकुंद अत्रे आणि त्यांचे पुत्र सागर अत्रे यांनी हा कार्यक्रम विनामूल्य सादर केला. हा कार्यक्रम स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर यांच्या पुढाकारातून माया केअर तर्फे झाला.

8. आई वृद्धाश्रम बावधन येथे 20 जून 2023 रोजी श्री रमेश फडके यांनी सुश्राव्य बासरी वादन आणि सौ नंदा गुळवणी यांनी मराठी गीते विनामूल्य सादर करून तेथील आजी आजोबांना मंत्रमुग्ध केले. हा कार्यक्रम माया केअर तर्फे सादर करण्यात आला.

9. स्वयंसेवक श्री अंकुश शिर्के आणि कविता परि हार यांनी 20 जून 2023 रोजी स्नेहबंध ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यक्रमात राजा मंत्री उद्यान पुणे येथे माया केअरच्या सेवांची माहिती दिली.

10. नूमवि प्रशाला पुणे च्या 1973 बॅचच्या विद्यार्थांच्या स्नेहमिलन कार्यक्रमात दिनांक 2023 जून रोजी मायाकेअर च्या माहिती पत्रकांचे वितरण करण्यात आले. यावेळी सुमारे 80 माजी विद्यार्थी उपस्थित होते. स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर यावेळी उपस्थित होते.

# रुग्णसेवेतील एक अनुभव

बुधवार दिनांक 10 मे  दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल च्या में आय हेल्प यू च्या काऊंटर वर मी दोन तास थांबून आलेल्या पेशंटना मदत ,मार्गदर्शन करून घरी आलो.जेवण झाले आणि एक कॉल आला. चेलाराम हॉस्पिटल मध्ये एका पेशंटला मदतीची गरज आहे . दमलो होतो पण गेलो. ज्यांना मदत हवी होती त्या स्त्रीचे नाव आहे नंदिनी गोरे (नाव मुद्दाम  बदलले आहे )पेशंट 85 वर्षाचा तर त्यांचे पती किती वर्षाचे असतील अशी पुसटशी कल्पना आली. मी गेलो तेव्हा ते त्यांच्या पत्नीसाठी डोसा आणायला गेले होते ते डोसा घेऊन आले.

बाई गेले  कित्येक दिवस बेड रिडन होत्या त्यामुळे त्यांना बेड सोर्स झाला होता आणि  त्यांचा कमरेखालच्या भागात संवेदना नव्हत्या  त्यामुळे त्यांना डोसा भरवावा लागला. पण डोशाबरोबरची चटणी तिखट होती त्यामुळे त्यांचेसाठी दही व साखर आणले. बाईंनी थोडाच डोसा खाल्ला उरलेला त्यांच्या यजमानांनी खाल्ला आणि रात्री आठ वाजेपर्यंत त्यांना सोबत करून घरी परतलो पुढील चार दिवस मी रोज त्यांच्या सोबतीला जात असे ,चार दिवसांनी त्यांचे ऑपरेशन झाले आणि नंतर त्यांना 17 मे रोजी पलाश  या संस्थेत हलविले, जिथे बेडरीडन पेशंट ची व्यवस्था करतात . पलाश हॉस्पिटल मध्ये त्यांचेशी बोलायला कोणीच नव्हते .त्यामुळे मी रोज त्यांचेबरोबर चार तास गप्पा मारणेसाठी जात असे . मी गेलो कि त्यांना झालेला आंनद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे आणि मग त्यांच्या मुलींचा अमेरिकेतून फोन येत असे. मे महिन्याचे 20 दिवस नंतर जून महिन्याचे 24  दिवस मी रोज जात असे .

मी दुसऱ्या एका स्वयंसेवी संस्थेत काम करतो ते दवाखाना चालवितात तो दवाखाना आम्ही ताम्हिणी या गावात ठेवला होता, तिथे काम करण्यासाठी मी तीन दिवस गेलो पुढे दोन दिवस आमच्या घरात नातीचे लग्न होते म्हणून गेलो नाही आणि मला फोन आला कि पेशंट सिरीयस आहे ताबडतोब या मी गेलो ,मला पेशंटने ओळखले आणि तिच्या चेहऱ्यावर झालेला आनंद स्पष्ट दिसत होता त्यांच्या मुलीचा फोन आला कि तुम्ही पाचसहा दिवस न भेटल्याने त्यांच्या आईची तब्येत बिघडली व त्या सिरीयस झाल्या मग त्यांची तब्येत सुधारली त्यांचे कुटुंबातील लोकांनी कितीतरी वेळा मला सांगितले कि केवळ तुमच्यामुळे  आमची आई वाचली , आता पेशंटची तब्येत सुधारत आहे. असा आहे माझा एक अनुभव.

स्वयंसेवक श्री.विनोद दफ्तरदार
मो: 9881138052

# मिस्डकॉल द्या, मुख्यमंत्री सहायता निधी मिळवा, शिंदे सरकारचा मोठा निर्णय

मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्यासाठी राज्य सरकारकडून आता नवी सुविधा योजना सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार संपर्कासाठी 8650567567 हा नवा मोबाइल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या क्रमांकावर मिस्डकॉल देताच मुख्यमंत्री सहायता निधीचा अर्ज मोबाइलवर उपब्लध करून दिला जाणार आहे.
ग्रामीण भागांसह राज्यातील इतर कानाकोपऱ्यांतून या सहायता निधीतून मदतीसाठी इच्छुक असणाऱ्या नागरिकांना या सुविधेमुळे दिलासा मिळणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत जाहीर केली जाते. विविध शस्त्रक्रिया, आजारांवरील उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत दिली जाते.

इच्छुकांनी या क्रमांकावर मिस्डकॉल दिल्यानंतर अर्जाची लिंक एसएमएसद्वारे मोबाइलवर येईल. त्या लिंकवर क्लिक करताच अर्ज डाउनलोड होईल. या अर्जाची प्रिंट काढून तो भरून त्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह सर्व पोस्टाद्वारे किंवा स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात cmrf.maharashtra.gov.in या ईमेल आयडीवर पाठवता येईल, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली.

# एका स्वयंसेविकेचा अनुभव

साधारण एक वर्षापूर्वी गणपती मंदिर टिटवाळा इथे माया केअर फाउंडेशन चा प्रचार करायला गेले असता तिथे एका 70 वर्षीय मावशी बरोबर माझी भेट झाली.

( नाव गिरीजाबाई कांबळे ) तिकडे मी त्यांना माया केअर फाउंडेशन बद्दल माहिती दिली आणि सांगितलं की कुठलीही मदत लागली तर आम्हाला कॉल करा. माया केअर ची स्वयंसेविका या नात्याने मी तुम्हाला मदत करेन. त्या मावशीना एक मुलगी आहे पण ती सुद्धा लग्नानंतर कुर्ला इथे शिफ्ट झाली त्यामुळे टिटवाळा येथे त्या मावशी एकट्याच असतात असं मला त्यांच्या बोलण्यावरून समजलं मी त्यांना सांगितलं की माया केअर फाउंडेशन नेहमी तुमच्या सोबत आहे, आणि राहील तुम्ही स्वतःला कधीच एकटं समजू नका. त्यांचा आपल्या मायाकेअरला पहिला कॉल हॉस्पिटल विजिट साठी आला . मी लगेच त्यांच्या मदतीला गेले. त्यानंतर बऱ्याच छोट्या-मोठ्या कामासाठी त्या मला कॉल करायच्या.

त्या वयोवृद्ध असल्यामुळे त्यांना चाला-फिरायला बराच त्रास व्हायचा त्यामुळे कधीकधी त्या त्यांच्या वेगवेगळ्या कामासाठी सुद्धा मला बोलावू लागल्या . ( किराणामाल आणून देणे, भाजी आणून देणे, मोबाईल रिचार्ज करून देणे, इत्यादी ) या सगळ्या कामासाठी मी त्यांना माया केअर कडून मदत करायचे).

एक दिवस त्यांचा मला अचानक रात्री कॉल आला ( साधारण दहा वाजता ) त्यांनी सांगितलं की अचानक त्यांच्या नाकातून रक्त यायला लागलं आहे आणि ते थांबत नाही आहे. त्या खूप घाबरल्या होत्या. त्यांनी मला लगेच घरी बोलवून घेतलं . मीही लगेच त्यांच्याकडे गेले आणि त्यांना डॉक्टर कडे घेऊन गेले .तिकडे गेल्यावर डॉक्टरांनी त्यांना चेक केले आणि त्यांचा अचानक बीपी वाढल्यामुळे नाकातून ब्लड येत आहे असं सांगून त्यांच्यावर योग्य तो उपचार केला. थोड्याच वेळात त्यांना आराम मिळाला. तेवढ्यात रात्री मी त्यांच्या मुलीला( कुर्ल्याला ) फोन करून मावशींच्या तब्येतीबद्दल माहिती दिली, आणि सांगितलं की तुम्ही काळजी करू नका मी त्यांच्यासोबत आहे. हे ऐकून त्यांनाही थोडा धीर आला आता जेव्हा कधी पण त्या त्यांच्या आईला टिटवाळ्याला भेटायला येतात तेव्हा आवर्जून मला कॉल करतात आणि मायाकेअरचे आभार मानतात. वेळोवेळी कांबळे मावशींना लागेल तशी माया केअर कडून मिळत मदत मिळत असल्यामुळे त्यांनाही आता एकटेपणा जाणवत नाही.बाकी माया केअर त्यांच्यासोबत आहेच.

अनुजा कदम, (टिटवाळा), मो. 8104919014

***

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.रागांयो-2016/प्र.क्र.64/ भाग 1/ आरोग्य -6, दिनांक 13 एप्रिल 2017 अन्वये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि.1 एप्रिल 2017 पासून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेच तपशील खालीलप्रमाणे:

1. लाभार्थी :- अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या पिवळ्या, अंत्योदय, अन्नपूर्णा योजना व केशरी (रु.1 लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न) शिधापत्रिकाधारक कुटुंबे तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा या शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे या योजनेचे लाभार्थी आहेत
2. विमा संरक्षण: या योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रतिवर्ष रुपये 1.50 लाखापर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.मूत्रपिंड प्रत्यारोपण ही मर्यादा प्रतिवर्ष 2.50 लाखापर्यंत आहे. लाभार्थी कुटुंबासाठी कोणत्याही एका व्यक्तीला व अनेक व्यक्तीना वरील योजनेचा लाभ घेता येतो.
3. योजनेत समाविष्ट उपचार: योजनेंतर्गत 30 विशेष सेवांतर्गत 971 उपचार व शस्त्रक्रिया तसेच 121 पाठपुरावा सेवांचा समावेश आहे.
4. विम्याचा हप्ता- या योजनेच्या लाभार्थी कुटुंबासाठी असणारा विमाच्या हप्ता राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नॅशनल इन्शुरन्स कंपनीस अदा करण्यात येतो
5. योजनेमध्ये समाविष्ट रुग्णालये - या योजनेमध्ये 30 पेक्षा अधिक खाटा असणाऱ्या शासकीय/निमशासकीय खाजगी तसेच धर्मादाय संस्थेच्या रूग्णालयांची निवड काही निकषांना अधीन राहून करण्यात आली आहे. लाभार्थी यांच्या मर्जीनुसार राज्यातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात घेऊ शकतो. निःशुल्क वैद्यकीय सेवा देखील आहेत.

मदतीसाठी संपर्क :- टोल फ्री क्रमांक:- 155388/ 1800232200

रुग्णालय- आरोग्य मित्र

पोस्ट बॉक्स - पो.बॉक्स क्र. 16565, वरळी पोस्ट ऑफिस, वरळी मुंबई - 400018

संकेतस्थळ- www.jeevandayee.gov.in



बीड येथील योगेश्र्वरी वृद्धाश्रमामध्ये जेष्ठांसोबत हितगुज
साधताना आमच्या स्वयंसेविका संजीवनी भुले.




धुळे येथे ज्येष्ठ नागरिकांसोबत योग दिन साजरा करत असताना
आमच्या स्वयंसेविका सुलताना शहा व वंदना साळुंखे.



कोल्हापूर येथील
श्री व सौ कुलकर्णी यांना
बँक फॉर्म भरण्यास
मदत करत असताना
आमच्या स्वयंसेविका
प्रियंका कुलकर्णी.



सोलापूर येथील
सौ. कुसुम उत्पात यांना
औषधे आणून देण्यास
मदत करत असताना
आमच्या स्वयंसेविका
शुभांगी जाधव.



सोलापूर येथील मंगल दशरथ ओल्ड होम येथील ज्येष्ठ नागरिकांसोबत
योगा दिन साजरा करत असताना स्वयंसेवक विशाल पुंडाले.



जालना येथील
ज्ञानेश्वरी पथडाई यांना
शासकीय कागदपत्राच्या
कामात मदत करत
असताना आमचे स्वयंसेवक
गोवर्धन बोरकर.



अकोला येथील मातोश्री वृद्धाश्रमातनिवासी आजी आजोबांसोबत
संवाद साधताना आमच्या स्वयंसेविका रेणुका तायडे.



चंद्रपूर येथील भैय्याजी वाढाई यांना औषध गोळ्या
पोहोच करताना आमच्या स्वयंसेविका मंदा कावडे.



नागपूर येथील शोभा तांडाले यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले असता आमचे स्वयंसेवक महेश बेलखेडे.



सांगली येथील कमलनाथ गोसावी यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन जात असताना आमचे स्वयंसेवक मच्छिंद्र पवार.



मुंबई येथील सौ शोभा कपिले यांना हॉस्पिटलमध्ये चेकअपसाठी घेऊन गेल्या असताना आमच्या स्वयंसेविका शारदा पारमेकर.




मुंबई येथील सुमंगला अभ्यंकर यांना सोबत करताना आमच्या स्वयंसेविका अनुजा कदम.




माया केअर आणि दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झालेल्या रुग्ण मित्र प्रकल्पाची माहिती देताना स्वयंसेवक विद्याधर जोशी.




रुग्ण मित्र प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. धनंजय केळकर, अधिष्ठाता दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल यांचा डॉ गोखले यांनी सत्कार केला.




रुग्णमित्र प्रकल्पात रुग्णाचे पॅथॉलॉजि रिपोर्ट काढण्यास मदत करताना स्वयंसेविका डॉ . सुवर्णा आगटे



रुग्णमित्र प्रकल्पाची माहिती समजावून घेताना स्वयंसेवक.

**Maya CARE Foundation**

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

**✻ सेवा ✻**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
|---|---|
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ,चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कछ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची,तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्रि्चम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

Merchant Name : **MAYA CARE FOUNDATION**
Mobile Number : **7721053535**

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

PRINTED MATTER

बुक-पोस्ट

FROM,

**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

TO,

श्री/श्रीमती ______________________